अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर २०२५ । वर्ष : २४ वे अंक : ३९ वा किंमत : ५ रुपये पाने १२

## मारहाणीत जखमी झालेल्या विवाहित तरुणाचा मृत्यू

### पंढरपूर येथील घटना

**सोलापूर** : पैशाच्या करणावरून मारहाणीत जखमी झालेला विवाहित तरुण सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी रात्री मरण पावला.

अनिल पाचू भडकवाड (वय ३० रा. यशनारायण झोपडपट्टी, पंढरपूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला रविवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास पैशाच्या कारणावरून सोमा आधटराव नावाच्या इसमाने घराजवळ येऊन बेदम मारहाण केली होती.

त्यात तो जखमी झाला होता. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात वर्षा घाडगे (बहीण) यांनी दाखल केले असता तो बुधवारी रात्री मरण पावला.

मयत अनिल भडकवाडच्या पश्चात एक मुलगा, आई, भाऊ आणि बहीण असा परिवार आहे. तो आईस्क्रीम विक्रीचा व्यवसाय करीत होता. त्याने मालकाकडून उचल घेतली होती. त्या पैशाच्या कारणावरून झालेल्या मारहाणीत तो जखमी झाला होता. अशी माहिती त्याच्या नातेवाईकांनी दिली. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# आरटीओजवळच्या ज्वेलर्स दुकानावर दरोडा टाकणारी टोळी जेरबंद

## शहर गुन्हे शाखेची कारवाई कोयता, मोटारसायकलींसह मोबाईल जप्त

**सोलापूर/प्रतिनिधी**

**सहा दिवसांपूर्वी आरटीओ ऑफिस रोडवरील समर्थ ज्वेलर्स या दुकानावर कोयता आणि पिस्तूलचा धाक दाखवत दरोडा टाकण्याचा प्रयत्न करणारी टोळी अखेर शहर गुन्हे शाखेच्या शिताफीच्या कारवाईत जेरबंद झाली आहे. या कारवाईत सहा आरोपींसह एक विधीसंघर्षित बालकाचा सहभाग उघड झाला आहे. पोलिसांनी लोखंडी कोयता, दोन मोटारसायकली आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत. याबाबतची माहिती पोलीस आयुक्त एम.राज कुमार यांनी गुरूवारी सायंकाळी पत्रकार परिषदेत दिली.**



साहिल दशरथ गायकवाड ( वय २०), समर्थ समीर गायकवाड आणि सार्थक दशरथ गायकवाड यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून चौकशीत अजिंक्य चव्हाण, विशाल जाधव, अनिकेत गायकवाड आणि एक विधीसंघर्षित बालकाचे नाव समोर आले.

१ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास तीन अज्ञात इसम निळ्या मोटारसायकलवर समर्थ ज्वेलर्स दुकानासमोर आले. यापैकी एक इसम बाहेर थांबला, तर उर्वरित दोघे दुकानात शिरले. त्यांनी कोयता व पिस्तूलाचा धाक दाखवत सोन्याचे दागिने बॅगेत भर अशी धमकी दिली. काळ्या जॅकेटधारी इसमाने काउंटर फोडत दागिने चोरण्याचा प्रयत्न केला, मात्र मालक दीपक वेदपाठक व कर्मचाऱ्यांच्या आरडाओरडीनंतर टोळी घटनास्थळावरून पसार झाली.

याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपआयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील व सहायक आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी गुन्हे शाखेच्या सात तपास पथकांना तपासाचे आदेश दिले. स.पो.नि. शैलेश खेडकर, शंकर धायगुडे, विजय पाटील, निलेश पाटील-सोनवणे, तुकाराम घाडगे व दत्तात्रय काळे यांनी सुमारे १२५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले.

या तपासादरम्यान दरोडेखोर यतीमखाना मैदानात एमएच १३ ईए २५७८ या मोटारसायकलवर थांबले आहेत, अशी माहिती पोलिसांनी मिळाली. सापळा रचून पोलिसांनी तिघांना जेरबंद केले.

यातील अजिंक्य चव्हाण आणि समर्थ गायकवाड यांनी यापूर्वी वळसंग हद्दीतील चौधरी फिलिंग सेंटरवर पिस्तूल व चाकूचा धाक दाखवून ३९ हजार रुपयांची लूट केली होती. त्या प्रकरणी वळसंग पोलिस ठाण्यात दाखल असलेलस गुन्हा उघडकीस आला आहे.

### यांनी केली कारवाई

ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपआयुक्त (मुख्यालय) गौहर हसन, परिमंडळ उपआयुक्त विजय कबाडे, उपआयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, स.पो.नि. शैलेश खेडकर, शंकर धायगुडे, विजय पाटील, मुकेश गायकवाड, निलेश पाटील-सोनवणे, तुकाराम घाडगे, दत्तात्रय काळे व सायबर शाखेच्या पथकांनी केली.

# महायुतीत भूखंडाचे 'श्रीखंड' १८०० कोटींचा जमीन घोटाळा

- पुण्यातील तहसीलदारासह दुय्यम निबंधक सस्पेंड
- अजित पवारांचे सुपुत्र पार्थ सापडले वादाच्या भोवऱ्यात
- उबाठाचे नेते दानवे यांच्या गौप्यस्फोटोने राज्यात खळबळ
- पळवाटा शोधून सरकारना लावला कोट्यवधींचा चुना
- चौकशीसाठी नेमली सचिवांची एकसदस्यीय समिती

**पुणे** : महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात गुरूवारी मोठा भूकंप झाला. त्याचे जबरदस्त हादरे मंत्रालयाला बसले. महायुतीच्या सत्तेतील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार हे जमीन घोटाळ्याच्या चक्रव्युहात अडकले आहेत. १८०० कोटींची जमीन पार्थ पवारांच्या कंपनीने केवळ ३०० कोटींमध्ये घेतली तसेच यासाठी स्टँप ड्युटी म्हणून केवळ ५०० रूपये मोजल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. विरोधकांकडून सातत्याने टीकेची झोड उठल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी लागली.या प्रकरणातील पुण्याचे तहसीलदार सूर्यकांत येवले तसेच दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना तडकाफडकी निलंबन करण्यात आल्याने सनदी अधिकाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.सिंचन घोटाळ्यातून अजित पवार यांना कशीबशी क्लिनचीट मिळाली पण मुलगा जमीन घोटाळ्यात अडकल्याने पवार फॅमिली पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडली.

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. फडणवीस यांनी याबाबत निर्दे श दिले आहेत. मात्र आपण व्यवहार केलाच नाही, अशी प्रतिक्रिया निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवलेंनी दिली. माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही.

मी व्यवहार केलेला नाही, त्याबद्दल मला माहिती नाही. आमच्याकडून परवानगी दिली गेली नाही. महार वतनाची जमीन होती, जो काय व्यवहार झाला, तो दुय्यम निबंधकासोबत झालाय, त्याबद्दल मला माहिती नाही. असे येवले म्हणाले.

पुण्यातील जैन बोर्डिंग आर्थिक व्यवहारानंतर आता पार्थ पवार यांच्या कंपनीलाही पुण्यातील १८०० कोटींची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये विकल्याची माहिती समोर आली आहे. या जमीन व्यवहारात गैरप्रकार झाले असून केवळ ५०० रुपयांच्या स्टँपड्युटीवर हा व्यवहार झाल्याचं प्रथमदर्शनी दिसून येत आहे. विरोधकांनी याप्रकरणी रान उठवल्यानंतर आता सरकारने कारवाईला सुरुवात केली असून पुण्यातील संबंधित जागा प्रकरणी तहसिलदारांचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी दुपारी १२ वाजता कारवाईचे संकेत दिल्यानंतर २ तासांच्या आतच याप्रकरणात तहसलिदारांचे निलंबन करण्यात आले आहे.



### पार्थ पवार यांची पहिली प्रतिक्रिया

दरम्यान, पार्थ पवार यांच्यावर जमिनीचा घोटाळा केल्याचा आरोप प्रकरणात त्यांच्याशी संपर्क साधण्याचा एबीपी माझाने प्रयत केला. पार्थ पवार यांच्याकडून आपण कोणतही चुकीचं काम अथवा घोटाळा केला नसल्याची फोनवरून प्रतिक्रिया देण्यात आली आहे. अधिकची माहिती देण्यास मात्र पार्थ पवार यांच्याकडून नकार देण्यात आला आहे.

### नेमके प्रकरण काय?

पुण्यातील महार वतन नोंदीची १८०० कोटींची जमीन पार्थ पवारांच्या कंपनीने केवळ ३०० कोटींमध्ये घेतली तसेच यासाठी स्टँप ड्युटी म्हणून केवळ ५०० रूपये मोजल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादस दानवे यांनी केला. महत्वाचे म्हणजे पार्थ पवारांनी कोरेगाव पार्कमध्ये आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयारीही चालवली, एक लाखाचे भांडवल असलेल्या कंपनीला हे कसे काय शक्य होते, असा सवाल दानवेंनी उपस्थित केलाय. या व्यवहारासाठी उद्योग संचालनालयाने ४८ तासात स्टॅम्प ड्युटीही माफ केली, तर केवळ २७ दिवसांत हा व्यवहार झाला असे दानवे म्हणाले.

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

या प्रकरणी फडणवीस यांना विचारले असता महसूल विभाग, आयजीआर, लँड रेकॉर्ड संदर्भातील सर्व माहिती मी मागवली आहे. या संदर्भातील योग्य ते चौकशीचे आदेश देखील मी दिलेले आहेत. तसेच प्राथमिक चौकशीच्या आधारावर मी यासंदर्भात मी पुढे बोलेन. अद्याप माझ्याकडे पूर्ण माहिती आलेली नाही. प्राथमिक स्तरावर जे मुद्दे समोर येत आहेत, ते मुद्दे गंभीर आहेत. त्यामुळे त्यावर योग्य प्रकारची माहिती घेऊनच बोलले पाहिजे. माहिती आल्यानंतर मी शासनाची पुढची दिशा काय? या प्रकरणात काय कारवाई होणार? या सर्व गोष्टी सांगितल्या जातील, असेही फडणवीस म्हणाले.

### दुय्यम निबंधक रवींद्र तारूही निलंबित

पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी झालेल्या जमीन व्यवहारप्रकरणी तहसीलदारांनंतर दुय्यम निबंधक रवींद्र तारुही निलंबित झाले आहेत. याप्रकरणी, नोंदणीच बेकायदा असल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आलीय. पुण्यातील कोरेगाव पार्कमधील मोक्याची आणि मोलाच्या ४० एकर जागेचा बेकायदा व्यवहार करुन मूळ मालक आणि सरकारची फसवणूक करीत, पार्थ पवार आणि त्यांच्या कंपनीने ही जागा खरेदी केल्याचे मुद्रांक शुल्क विभागाच्या प्राथमिक चौकशीत पुढे आले आहे. त्यामुळे, हा संपूर्ण व्यवहार पूर्णपणे बेकायदा दिसत असल्याचे दाखवून पुण्यातील उपनिबंधक रवींद्र तारुंना निलंबित करण्यात आले आहे. मुद्रांक शुल्क विभागाकडून ही कारवाई करण्यात आलीय.

### अजित पवारांचा संताप... असले काहीही चुकीचे मला चालणार नाही


सुरुवातीला याप्रकरणी माध्यमांना टाळणाऱ्या अजित पवारांनी अखेर समोर येऊन आपली भूमिका मांडली. माझा त्या व्यवहाराशी दुरान्वये संबंध नाही, मी कुणालाही फोन केला नाही किंवा चुकीच्या कामाला माझे कसलंही समर्थन नाही, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी जरूर चौकशी करावी, असेही त्यांनी म्हटले. मागे ३-४ महिन्यांपूर्वीही अशा-अशा गोष्टीचे काहीतरी चालल्याचे कानावर आले. त्यावेळेसच मी सांगितले की, असले काहीही चुकीचे केलेले मला चालणार नाही, असल्या चुकीच्या गोष्टी कुणीही करू नका अशा स्पष्ट सूचना मी दिलेल्या होत्या, परंतु त्यानंतर काय झाले ते मला माहिती नाही, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली आहे.

# शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार

## ज्येष्ठ नेते बळीराम साठे यांच्यासह सुधीर खरटमल अजित पवार गटात

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जीव टांगणीला!

संगम श्री डे
480-27-269

संगम श्री नाईट
578-02-345

कल्याण
578-00-460

मुंबई
133-72-499





**सोलापूर** : शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गुरूवारी प्रवेश केला. अचानक सुधीर खरटमल यांनी घेतलेल्या निर्णयाने सोलापुरातील पवार गटाला चांगलाच धक्का बसला आहे. यामुळे आता अजितदादांच्या पार्टीला चांगलेच बळ आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

सुधीर खरटमल आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी यांच्यात गेल्या काही दिवसांपासून धूसफूस सुरू होती. त्यातूनच खरटमल यांनी उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत घड्याळ हाती बांधले. खरटमल आणि शरद पवार गटातील पदाधिकाऱ्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून मतभेद वाढले होते. बैठकींना अनुपस्थित राहणे आणि भाजपाशी संबंधित कार्यकर्त्यांना सहभागी करणे यामुळे तणाव निर्माण झाला होता.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळख असलेले सुधीर खरटमल यांनी २०२१ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांच्यावर सोलापूर शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. पक्षांतर्गत राजकारणाला कंटाळलेले सुधीर खरटमल यांनी शरद पवार यांनी नुकतेच बोलावलेल्या बैठकीला दांडी मारली होती. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार . या वेळी प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे, कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यासह सोलापूर शहराध्यक्ष संतोष पवार, किसन जाधव हे उपस्थित होते.

### शरद पवार गटावर नवा अध्यक्ष शोधण्याची वेळ

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुधीर खरटमल यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला धक्का बसला असून त्यामुळे नव्या शराध्यक्षांवर थेट महापालिका निवडणुकीचा भार येऊ पडणार आहे. त्यामुळे खरटमल यांच्या जागी शहराध्यक्ष म्हणून कोणाची निवड होते, हे पाहावे लागणार आहे.

> नातवाच्या लग्नाची निमंत्रण पत्रिका देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट झाली. त्या भेटीत राष्ट्रवादी प्रवेशाबाबत चर्चा झाली आहे. कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन लवकरच पक्षप्रवेशाची तारीख निश्चित करण्यात येणार आहे
>
> **–बळीरामकाका साठे**

**सोलापूर** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात लवकरच घरवापसी होणार आहे. त्याला खुद्द साठे यांनी दुजोरा दिला आहे. कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन पक्षप्रवेशाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल, असे साठे यांनी स्पष्ट केले आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे यांनी नातू जयदीप साठे यांच्या विवाहाची निमंत्रण पत्रिका देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत नुकतीच भेट घेतली. त्या भेटीतच साठे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश निश्चित झाला आहे. या भेटीवेळी आमदार राजू खरे, जयदीप साठे व इतर उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदावरून अपमानास्पदरित्या उचलबांगडी करण्यात आल्यानंतर बळीराम साठे यांनी पक्षाचा राजीनामा देणार असल्याचे जाहीर केले होते.

शरद पवार यांनी शब्द देऊनही पक्षात मानसन्मान मिळत नसेल पाहून बळीराम साठे यांनी वडाळयात कार्यकर्ते, पदाधिकारी यांचा मेळावा घेत यापुढे शरद पवार यांच्या पक्षाशी आपला यापुढे कुठलाही संबंध नसेल, असे जाहीर केले होते.

त्यावेळी त्यांनी कुठल्याही पक्षात न जाता स्वतंत्रपणे निवडणुका लढविण्याचे ठरविले होते. त्यांनी आता अजितदादांच्या राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घेतला आहे. मला पद मिळावे; म्हणून पक्षात जात नसून सत्तेच्या माध्यमातून सर्वसामन्यांची कामे होतील,, असे साठे म्हणाले.

## मोटारसायकलच्या धडकेने एकाचा जागीच मृत्यू

**मॉर्निंग वॉकला गेल्यानंतर घडलेली दुर्घटना**



**बार्शी** : बार्शी शहरातील परंडा रस्त्यावर गुरूवारी पहाटेच्या सुमारास भरधाव मोटारसायकलने पाठीमागून दिलेल्या जोरदार धडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला.या दुर्घटनेत संजय मारुती अनभुले (वय ५५, रा. नाईकवाडी प्लॉट, बार्शी) ठार झाले.

फिर्यादी विजय मारुती अनभुले (वय ५३) यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते स्वतः महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथे नोकरीस असून, दररोज सकाळी भाऊ संजय अनभुले व मावस चुलते भास्कर डिसले यांच्यासह बार्शी-परंडा रस्त्यावर मॉर्निंग वॉकसाठी जात असतात. आजही पहाटे पाचच्या सुमारास तिघेजण वॉकसाठी गेले होते. सकाळी सहा वाजताच्या दरम्यान परंडा रोडवरील पटेल यांच्या पॅरागॉन चप्पल शोरूमजवळ येताच, मागून भरधाव वेगात आलेल्या हिरो कंपनीच्या एच.एफ. डिलक्स (एम. एच.१३ सी.आर.८३६६) या मोटारसायकलने संजय अनभुले यांना जोरात धडक दिली. धडकेत ते रस्त्यावर कोसळले. विजय अनभुले व भास्कर डिसले यांनी तातडीने ॲम्ब्युलन्स बोलावून जगदाळे मामा हॉस्पिटल येथे त्यांना नेले मात्र, डॉक्टरांनी तपासून संजय अनभुले यांना मृत घोषित केले. अपघातानंतर नागरिकांनी मोटारसायकल व दोन्ही युवकांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. मोटारसायकल चालवणाऱ्या युवकाचे नाव लव्हू पवार (वय १९, रा. इंद्रानगर, पारशीक खारेगाव, ठाणे) असे असून त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू केला आहे.या घटनेमुळे बार्शी शहरात हळहळ व्यक्त होत आहे.